# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः30.03.2025** **वारःरविवार**

---

१. पंतप्रधान नरेंद्र मोदी आज नागपूर आणि छत्तीसगढच्या दौऱ्यावर

२. पर्यावरण रक्षण आणि संवर्धनासाठी अनुकूल जीवनशैली अंगिकारण्याचं राष्ट्रपतींचं आवाहन

३. आकाशवाणीवरुन मन की बातद्वारे पंतप्रधान आज साधणार संवाद

४. भूकंपग्रस्त म्यानमाला मोठी मदत पुरविण्यासाठी भारताद्वारे ब्रह्म मोहीम, मृत्यु संख्या सोळाशेवर. आणि

५. WTT स्टार कंटेंडर स्पर्धेत भारताच्या मानव ठक्करची ऐतिहासिक कामगिरी

**<u>पंप्र-दौरा</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज महाराष्ट्र आणि छत्तीसगढ दौऱ्यावर येत आहे. नागपूर इथं सकाळी ते रेशीमबाग मैदानावरील स्मृती मंदिरात जाऊन दर्शन घेतील आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे संस्थापक डॉक्टर केशव हेडगेवार आणि माधवराव गोळवलकर गुरुजी यांना आदरांजली अर्पण करतील. त्यानंतर दीक्षाभूमीला भेट देऊन डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांना आदरांजली वाहतील. माधव नेत्रालय केंद्राच्या विस्तारित प्रकल्पाची पायाभरणी केल्यानंतर ते सार्वजनिक सभेला संबोधित करतील. सोलर डिफेन्स आणि एरोस्पेस लिमिटेडच्या लॉयटरिंग म्युनिशन चाचणी रेंज आणि धावपट्टीचं उद्घाटन पंतप्रधानांच्या हस्ते नियोजित आहे.

यानंतर दुपारी साडेतीन वाजता पंतप्रधान छत्तीसगढमध्ये बिलासपुर इथं जातील. 33 हजार 700 कोटी रुपये खर्चाचे अनेक विकास प्रकल्पांचं राष्ट्रार्पण ते करणार आहेत. यामध्ये छत्तीसगढमधील वीज ग्रीड आणि उपलब्धता बळकट करण्यासाठी प्रकल्पांचा समावेश आहे. विशेषतः आदिवासी आणि औद्योगिक भागांमध्ये रेल्वे आणि रस्ते विकास, शैक्षणिक पायाभूत सुविधांशी निगडीत हे प्रकल्प आहेत. छत्तीसगढच्या 29 जिल्ह्यांमधील 130 पी एम श्री शाळा ते समर्पित करतील. प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत 3 लाख लाभार्थ्यांचे गृह प्रवेश देखील मोदी यांच्या उपस्थितीत होणार आहेत.

**<u>राष्ट्रपती</u>**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी पर्यावरणाप्रती जागरूक आणि संवेदनशील जीवनशैली स्वीकारण्यावर भर दिला आहे. नवी दिल्लीतील विज्ञान भवन इथं पर्यावरणावरील राष्ट्रीय परिषदेचं उद्घाटन करताना त्या काल बोलत होत्या. राष्ट्रीय हरित न्यायाधिकरणानं या दोन दिवसांच्या कार्यक्रमाचं आयोजन केलं आहे. पर्यावरण संरक्षण आणि त्याचा प्रचार केवळ जागरूकता आणि सर्वांच्या सामूहिक प्रयत्नांवर आधारित सतत सक्रियतेद्वारेच शक्य होईल असं आग्रही प्रतिपादन द्रौपदी मुर्मू यांनी केलं. भविष्यातील पिढ्यांना स्वच्छ पर्यावरणाचा वारसा प्रदान करणं ही आपली नैतिक जबाबदारी असं सांगून राष्ट्रपतींनी नमूद केलं की स्वच्छ पर्यावरण आणि आधुनिक विकासाचं संतुलन साधणं ही एक संधी आणि आव्हान दोन्ही आहे.

याप्रसंगी बोलताना सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती विक्रम नाथ यांनी सरकारी धोरणांमध्ये हरित तंत्रज्ञानांना प्रोत्साहन दिले पाहिजे आणि उद्योगांनी त्यांच्या पर्यावरणीय परिणामांची जाणीव ठेवली पाहिजे यावर भर दिला. राष्ट्रीय हरित  न्यायाधीकरणाचे अध्यक्ष न्यायमूर्ती प्रकाश श्रीवास्तव देखील यावेळी उपस्थित होते. ही परिषद सहकार्याला चालना देणं, जागरूकता वाढवणं आणि पर्यावरण संरक्षण आणि शाश्वततेच्या सामूहिक ध्येयाला पुढे नेण्यासाठी एक महत्त्वाचं पाऊल आहे.

**<u>माओवादी</u>**

छत्तीसगडमध्ये बस्तर विभागातील सुकमा जिल्ह्यात सुरक्षा बलांसोबत काल झालेल्या चकमकीत ११ महिला माओवाद्यांसह १७ माओवादी ठार झाले. या चकमकीत चार जवान जखमी झाले. जखमी जवानांची प्रकृती धोक्याबाहेर आहे.

या चकमकीत ठार झालेल्या जगदीश उर्फ बुधरा या नक्षलवाद्यावर २५ लाख रुपयांचं बक्षीस जाहीर करण्यात आलं होतं. बस्तर विभागातील केरलापाल इथं माओवादी असल्याची माहिती मिळाल्यानंतर सीआरपीएफ आणि डीआरजीच्या संयुक्त पथकानं नक्षलविरोधी कारवाई केली. ठार झालेल्या माओवाद्यांचे मृतदेह सुरक्षा दलांनी घटनास्थळावरून ताब्यात घेतले आहेत.

याशिवाय, मोठ्या प्रमाणात शस्त्रं आणि दारूगोळा देखील जप्त करण्यात आला आहे. छत्तीसगडचे उपमुख्यमंत्री आणि गृहमंत्री विजय शर्मा यांनी सांगितलं की, या वर्षी आतापर्यंत विविध चकमकींमध्ये एकशे तेहतीस माओवादी मारले गेले आहेत.

**<u>मनकीबात</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज सकाळी ११ वाजता आकाशवाणीवरच्या ‘मन की बात’ या कार्यक्रमातून नागरिकांशी संवाद साधतील. या कार्यक्रमाचा हा १२० वा भाग आहे. आकाशवाणी आणि  दूरदर्शनच्या सर्व वाहिन्या, संकेतस्थळं, पंतप्रधान कार्यालय,  माहिती आणि प्रसारण मंत्रालयाचे यूट्यूब चॅनल आणि न्यूज ऑन AIR या ॲप वर या कार्यक्रमाचं थेट प्रसारण होईल. त्यानंतर लगेच आकाशवाणीवरून प्रादेशिक भाषांमध्ये या कार्यक्रमाचं प्रसारण होईल.

**म्यानमा मदत**

भूकंपग्रस्त म्यानमाला सहाय्य करण्यासाठी भारतानं 'ऑपरेशन ब्रह्मा' सुरू केलं असून त्याअंतर्गत भारतीय हवाई दलाची पाच विमानं म्यानमामधील यंगून आणि ने पी ताव इथं उतरली आहेत, अशी माहिती परराष्ट्र व्यवहार मंत्रालयानं दिली आहे. विमानात एचएडीआर साहित्य, ६० पॅरा फिल्ड ॲम्ब्युलन्स आणि राष्ट्रीय आपत्ति व्यवस्थापन दलाचे जवान होते. एनडीआरएफचं  पथक आणि १० टन मदत साहित्य तसंच६० पॅरा फिल्ड ॲम्ब्युलन्स घेऊन दोन सी-१७ विमानं  आणि दोन सी-१३० विमाने ने पी ताव इथं दाखल झाली आहेत.

यापूर्वी काल सकाळी एएफएस हिंडन हवाई तळावरून  हवाई दलाच्या सी-१३० विमानातून भूकंपग्रस्त म्यानमामध्ये सुमारे १५ टन मदत सामग्री पाठविण्यात आली होती. भूकंपानंतर अजूनही विमानतळ पूर्णपणे कार्यान्वित झालेला नसतानाही  राजधानीत बचावासाठी  कर्मचारी पाठवणारा भारत हा पहिला देश ठरला आहे. एनडीआरएफचं  पथक आज मंडाले इथं रवाना होणार असून, मदत आणि बचाव कार्यासाठी शहरात पोहोचणारं  हे पहिलं पथक ठरलं आहे.

हवाई उड्डाणे आणि नौदलाच्या जहाजांनी पाठवलेली एकूण मदत १३७ टन असून आवश्यकतेनुसार आणखी मदत पाठवली जाणार असल्याची माहिती सूत्रांनी दिली. भारतीय लष्कराने तातडीची मदत करण्यासाठी एक विशेष वैद्यकीय कृतिदलदेखील तैनात केलं आहे.

संरक्षण मंत्रालयाने जारी केलेल्या निवेदनात म्हटले आहे की, शत्रुजित ब्रिगेड मेडिकल रिस्पॉन्सर्सचे ११८ जणांचं पथक तैनात करण्यात आलं आहे.

या मोहिमेचा एक भाग म्हणून भारतीय लष्कर आपत्तीत जखमी झालेल्यांना तात्काळ उपचार देण्यासाठी 60 खाटांचं वैद्यकीय उपचार केंद्र स्थापन करणार आहे. आपत्तीमुळे अडचणीत असलेल्या स्थानिक आरोग्य व्यवस्थेला आधार देण्यासाठी ट्रॉमा केसेस, आपत्कालीन शस्त्रक्रिया आणि आवश्यक वैद्यकीय सेवा हाताळण्यासही सुविधा सक्षम असेल. ही मानवतावादी मदत आपल्या शेजारी प्रथम ' धोरणाप्रती भारताची बांधिलकी आणि 'वसुधैव कुटुंबकम'च्या मूल्यांना अधोरेखित करणारी आहे.

**ओडिशा दिन**

ओडिशा राज्याचा मंगळवारी स्थापना दिवस आहे. त्यानिमित्त ओडिशा दिन सोहळा 2025 चं  आयोजन मंगळवारी, 1 एप्रिल रोजी जवाहरलाल नेहरू स्टेडियममध्ये करण्यात आलं  आहे. राज्य स्थापना दिनाचं औचित्य साधून आणि राज्याच्या स्थापनेसाठी संस्थापकांनी दिलेल्या अमूल्य योगदानाबद्दल त्यांना आदरांजली वाहण्यासाठी या कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं आहे. कला, संस्कृती, वारसा आणि पर्यटन हे  या कार्यक्रमाचं सूत्र आहे.

**दिल्ली हवा गुणवत्ता**

हवेच्या गुणवत्तेत सुधारणा झाल्यानंतर दिल्लीच्या राष्ट्रीय राजधानी क्षेत्रातील ग्रेडेड रिस्पॉन्स ॲक्शन प्लॅन अर्थात जीआरएपीचे पहिल्या टप्प्यातील निर्बंध सीएक्यूएमनं उठवले आहेत. केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने दिलेल्या माहितीनुसार, दिल्लीचा हवा गुणवत्ता निर्देशांक अर्थात एक्यूआय काल १५३ नोंदला गेल्यानंतर हा निर्णय घेण्यात आला आहे. तीव्र पृष्ठभागावरील वारे आणि अनुकूल हवामान परिस्थितीमुळे राष्ट्रीय राजधानीतील हवेच्या गुणवत्ता निर्देशांकामध्ये लक्षणीय सुधारणा झाली असल्याचं सीएक्यूएमनं म्हटलं आहे

**जलसंवर्धन अभियान**

पावसाच्या पाण्याचा प्रत्येक थेंब वाचवत, जल संवर्धन करण्यासाठी आज गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर मध्य प्रदेशात 'जल गंगा संवर्धन महाअभियान' सुरू करण्यात येणार आहे. मुख्यमंत्री डॉ. मोहन यादव उज्जैनमधील क्षिप्रा नदीवर या मोहिमेचं औपचारिक उद्घाटन करतील. या मोहिमेचा समारोप ३० जून रोजी होणार आहे. ही राज्यव्यापी मोहीम ९० दिवसांहून अधिक काळ चालणार असून भूजल पातळी सुधारणं आणि जलसंधारणाविषयी जनजागृती करणं हे या उपक्रमाचं उद्दीष्ट आहे.

**आय पी एल**

इंडियन प्रीमियर लीग (आयपीएल) क्रिकेट स्पर्धेत काल गुजरात टायटन्स संघानं मुंबई इंडियन्सवर ३६ धावांनी मात केली. गुजरात टायटन्सने प्रथम फलंदाजी करताना साई सुधारनच्या ४१ चेंडूत केलेल्या ६३ धावांच्या जोरावर निर्धारित २० षटकांत ८ बाद १९६ धावा केल्या. मुंबईकडून हार्दिक पांड्याने सर्वाधिक दोन गडी बाद केले. प्रत्युत्तरादाखल मुंबई इंडियन्सला २० षटकांत ६ गडी गमावून १६० धावा करता आल्या. सूर्यकुमार यादवनं २८ चेंडूत सर्वाधिक ४८ धावा केल्या. गुजरातकडून मोहम्मद सिराज आणि प्रसिद्ध कृष्णा यांनी प्रत्येकी दोन गडी बाद केले.

**ठक्कर**

टेबल टेनिसपटू मानव ठक्कर हा डब्ल्यूटीटी स्टार स्पर्धेच्या उपांत्य फेरीत प्रवेश करणारा पहिला भारतीय ठरला असून त्याद्वारे त्यानं इतिहास रचला आहे. चेन्नई इथं झालेल्या स्पर्धेत ठक्करनं ऑलिम्पिक आणि जागतिक पदक विजेत्या दक्षिण कोरियाच्या लिम जोंगूनवर ३-२ असा थरारक विजय मिळवला.

याआधी त्याने उपांत्यपूर्व फेरीत जर्मनीच्या आंद्रे बर्टेल्समीयरचा ३-२ असा पराभव केला होता. ही कामगिरी भारतीय टेबल टेनिससाठी एक महत्त्वाचा मैलाचा दगड ठरला आहे.

**याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं. नमस्कार.**